**अतारांकित प्रश्नोत्तरांची ६ वी यादी**

# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२५**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**पोंभूर्ले (ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग ) येथे**
**दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मारकाचा विकास करणेबाबत**

**(१) २८२ (२४-०४-२०२५). श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोंभूर्ले (ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग) हे गाव मराठी वृत्तपत्राचे जनक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांची जन्मभूमी असून सदर गाव पुस्तकाच्या गावापासून अद्याप वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गाव पुस्तकाचे गाव म्हणून जाहिर करून तेथे दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मारकाचा प्राधान्याने विकास करण्याची मागणी जनतेतून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२७-०६-२०२५) :** (१), (२), (३) आणि (४)

ग्रामपंचायत,पोंभूर्ले-मालपेवाडी यांच्या संयुक्त प्रयत्नाने या गावातील पुस्तकांच्या दालनांच्या जागा निवड करुन त्याचे लोकार्पण सोहळा दिनांक १० मार्च,२०२४ रोजी करण्यात आला आहे.

दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मारकाचा विकास हा ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडून हाताळला जात असल्याने ग्रामविकास व जलसंधारण विभागास विभागाच्या दिनांक ०८.०५.२०२५ व दिनांक ०९.०६.२०२५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

---

**राज्यात मराठी भाषेचा प्रचार, प्रसार आणि वापर करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना**

**(२) २८५ (२४-०४-२०२५). श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे व इचलकरंजी शहरात अखिल भारतीय मराठी संमेलनाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त स्मृती जागर कार्यक्रम साजरा करण्यात आला असून याप्रसंगी मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी सर्वांनी घरात, व्यवहारात, जीवनात, मराठी भाषेचे अनुकरण करावे आणि मराठी वाढवण्यासाठी सीमा भागासह राज्यभर मराठी भाषेच्या कार्यशाळा सुरू करण्याची गरज

असल्याचे मत साहित्यिकांनी व्यक्त केले असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठी भाषेच्या समृद्धीसाठी गाव, खेडी, शाळा, ग्रंथालय, शहर व वस्त्यांमधून मराठी भाषेतील ग्रंथ व्यवहार चिंताजनक असल्याने त्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्ञानभाषा मराठी भाषेचा प्रचार, प्रसार आणि वापर करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. उदय सामंत (२७-०६-२०२५) :** (१) अखिल भारतीय मराठी साहित्य मंहामंडळाकडून संमेलनाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त पुणे व इचलकरंजी शहरात स्मृती जागर कार्यक्रम साजरा करण्यात आलेला नाही.
(२) मराठी भाषा विभागाच्या अधिपत्याखालील राज्य मराठी विकास संस्थेमार्फत मराठी भाषेच्या समृध्दीसाठी खालीलप्रमाणे उपाययोजना/उपक्रम राबविण्यात येत आहेत.
१. महाराष्ट्राबाहेरील अन्य राज्यात असलेल्या मराठी भाषकांसाठी विविध उपक्रम करण्याची तरतूद राज्य मराठी विकास संस्थेच्या घटनेत आहे. सदर तरतूदीच्या अनुषंगाने बृहन्महाराष्ट्र मंडळामार्फत साहित्य संमेलन आयोजित करण्यासाठी रु.२५ लक्ष इतका निधी मंजूर करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
२. तसेच महाराष्ट्रातील सीमाभागातील मराठी साहित्य संस्थांकडून मराठी भाषेचा प्रचार-प्रसार करणाऱ्या मराठी भाषेच्या विविध विषयावरील व्याख्याने, मराठी नव कवींना व्यासपीठ मिळावे यासाठी, मराठी नाट्य लेखनाची, मराठी बालकथालेखन, सीमाभागात मराठी बालसाहित्य संमेलनाचे आयोजन करणे, मराठी शिक्षक परिषद, काव्य लेखन तसेच अभिरुची वाढविण्यासाठी अशा इत्यादी विविध उपक्रमांच्या कार्यशाळा मराठी भाषा विभागाच्या अधिनस्त राज्य मराठी विकास संस्थेकडून घेण्यात येते तसेच अर्थसहाय्य करण्यात येत असते.
महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृध्दिंगत होण्यासाठी कार्य करणाऱ्या देशांतर्गत बृहन्महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त संस्थांना / मंडळांना रु.२० लक्ष ( प्रत्येकी २.०० लक्ष च्या मर्यादेत ) दिनांक १७.०४.२०१५ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती.
३. बृहन्महाराष्ट्रातील (परदेशातील) मराठी जनतेला, राज्याच्या विकास योजनांची, उपक्रमांची व या माध्यमातून उपलब्ध असलेल्या संधींची माहिती सुलभपणे प्राप्त व्हावी यासाठी "एक खिडकी योजना" कार्यान्वित करण्यास दिनांक १३.०६.२०१७ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.
४. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा सप्ताह निमित्ताने राज्य मराठी विकास संस्थेव्दारे महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागात परिसंवाद, चर्चासत्रे यांचे महाजालीय स्वरुपात आयोजन करणे तसेच शाळा, ग्रंथालयांना संस्थेने प्रकाशित केलेली पुस्तके, पाठ्यपुस्तके, मासिके भेट स्वरुपात पाठविण्याची कार्यवाही संस्थेकडून करण्यात येते.
(३) मराठी भाषा विभागाच्या अधिनस्त राज्य मराठी विकास संस्थेच्या घटनेतील क्र.१३ या उद्दिष्टांनुसार अन्य राज्यात असलेल्या मराठी भाषकांसाठी विविध उपक्रम करणे, ज्ञानभाषा मराठी भाषेचा प्रचार, प्रसार व जतन संवर्धन करण्यासाठी अनेक योजना / उपक्रम / प्रकल्प राबविण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उरण (जि. रायगड) येथील गावातील ग्रामस्थांना दुषित पाणी पुरवठा होत असल्याबाबत

**(३) ३११ (०१-०५-२०२५). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण (जि. रायगड) येथील पुनाडे धरणातील फिल्टरची दुरुस्ती न झाल्याने पुनाडे, वशेणी सारडे, पिरकोन, पाले, गोवठणे, आवरे, कडापे व पाणदिवे या गावातील ग्रामस्थांना गढूळ व दुषित पाणी पुरवठयामुळे रोगराई पसरुन डायरीया व

कावीळ या आजाराची लागण झाल्याचे दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२४ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या गावातील ग्रामस्थांना दुषित पाणी पुरवठा होत असल्याने पुनाडे धरणातील फिल्टरची दुरुस्ती करण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची ग्रामस्थांना स्वच्छ पाणी पुरवठा करण्यासाठी सदर फिल्टरची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०९-०७-२०२५) :** (१) हे खरे नाही.

सद्या अस्तित्वातील पुनाडे पाणी पुरवठा योजनेतून पुनाडे, वशेणी सारडे, पिरकोन, पाले, गोवठणे, आवरे, कडापे व पाणदिवे या आठ गावांना आठ गाव पाणी पुरवठा योजना शिखर समितीमार्फत दैनंदिन पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

जलजीवन मिशन अंतर्गत पुनाडे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. या योजनेअंतर्गत अस्तित्वातील जलशुध्दीकरण केंद्रामधून शुध्द स्वरूपात पाणी पुरवठा होणेसाठी आवश्यक स्थापत्य व यांत्रिकी दुरूस्तीची सर्व कामे पूर्ण करून, सदर जलशुध्दीकरण केंद्र ०१ जून, २०२४ पासून आठ गाव पाणी पुरवठा योजना समितीला दैनंदिन पाणी पुरवठ्याकरीता हस्तांतरीत करण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर विद्यापीठाचे शैक्षणिक सुविधा केंद्र प्रत्येक जिल्हयात उभारण्याबाबत**

**(४) ४२१ (३०-०४-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर विद्यापीठाचे कार्यक्षेत्र वर्धा, भंडारा, गोंदिया आणि नागपूर जिल्ह्यात पसरलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वर्धा, भंडारा, गोंदिया जिल्ह्यातील विदयार्थ्यांना विविध प्रकारच्या प्रमाणपत्रासह इतर शैक्षणिक कागदपत्रांसाठी अनेकदा नागपूरला यावे लागत असल्याने त्यांचा वेळ व पैशाचा अपव्यय होत असल्याने नागपूर विद्यापीठ प्रशासन प्रत्येक जिल्हयात सुविधा केंद्र उभारणार असल्याचे विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१९-०६-२०२५) :** (१) होय,
(२) होय,
या संदर्भात दिनांक ०२.०१.२०२५ रोजी संपन्न झालेल्या अधिसभेत विद्यापीठाचे प्र-कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केलेली असून सदर समितीद्वारे दिनांक १५ एप्रिल २०२५ पासून (१) नबिरा महाविद्यालय, काटोल जि.नागपूर (२) जे.एम.पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय भंडारा (३) इंद्रप्रस्थ न्यु आर्टस, कॉमर्स अ‍ॅन्ड सायन्स कॉलेज, वर्धा आणि (४) धोटे बंधु महाविद्यालय, गोंदिया या महाविद्यालयात विद्यार्थी सुविधा केंद्रे सुरु करण्यात आलेली आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अडपल्ली येथील जमीनचे भूसंपादन करून गोंडवाना विद्यापीठाच्या अंदाजपत्रकाला मान्यता देण्याबाबत

**(५) ९२९ (३०-०४-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंडवाना विद्यापीठाने गडचिरोली-नागपूर महामार्गावर असलेल्या अडपल्ली येथे १७० एकर जमीन संपादीत केलेली असून सदर जागेवर सुसज्ज व अत्याधुनिक सोयी सुविधांसह नवीन कॅम्पस विकसित करण्यासाठी रू. ८६४ कोटी खर्चाचे अंदाजपत्रक विद्यापीठाने राज्य शासनाला माहे सप्टेंबर, २०२४ मध्ये सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोंडवाना विद्यापीठाला उक्त प्रयोजनासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१९-०६-२०२५) :** (१) खरे नाही.

विद्यापीठामार्फत पहिल्या टप्प्यात प्राधान्याने करावयाच्या बांधकामाचा रु.२००.०० कोटीचा प्रस्ताव तयार करुन मा.मुख्य वास्तुशास्त्रज्ञ सार्वजनिक बांधकाम विभाग यांना सादर करण्यात आला आहे.

(२) लागू नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राणिसावरगांव ते पालम व्हाया सिरसम (पालम) (जि.परभणी) या रस्त्याचे सिमेंट कॉँक्रीटीकरण व रस्त्यावर लहान पूल बांधण्याबाबत

**(६) १४६५ (१८-०४-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या संशोधन विकास कार्यक्रमाअंतर्गत राणिसावरगांव ते पालम व्हाया सिरसम (पालम) या रस्त्याचे सिमेंट कॉँक्रीटीकरण व रस्त्यावर लहान पूल बांधण्यासाठी सुमारे ३१०.६० लक्ष एवढ्या खर्चास दिनांक ६ सप्टेंबर, २०२३ रोजी प्रशासकीय मान्यता व दिनांक १५ मार्च, २०२४ रोजीच्या पत्रान्वये ई-निविदा स्विकृतीस शासनाने तत्वत: मान्यता प्रदान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाची वर्क ऑर्डर माहे एप्रिल,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान काढण्यात येऊनही अद्यापही कामास सुरुवात झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन सदर काम तातडीने सुरु करण्याबाबत तसेच या प्रकरणी विलंबास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (२७-०५-२०२५) :** (१) होय,हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) माहे जुलै २०२४ ते सप्टेंबर २०२४ या काळात पावसाळा व अतिवृष्टीमुळे मातीकाम करण्यास अडथळा निर्माण झाल्याने तसेच गौणखनिज (रेती) उपलब्ध न झाल्याने याबाबींमुळे काम अपेक्षित गतीने झाले नाही. प्रस्तुत प्रकरणी संबधित कंत्राटदाराने कामाची गती न वाढविल्याने त्यांना दिनांक २७ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या आदेशान्वये दिनांक ३० ऑक्टोबर २०२४ रोजी पासून प्रति आठवडा रू.३०,०००/- इतकी दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## राज्यात आय टी आय प्रवेशात आदिवासी विद्यार्थ्यांना अवैध ठरविण्यात आल्याबाबत

**(७) १९४३ (२८-०४-२०२५). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०२३ मध्ये आयटीआय प्रवेश घेतेवेळी विद्यार्थ्यांनी धर्मांचा उल्लेख न केल्याने शेकडो आदिवासी विद्यार्थ्यांचा प्रवेश अवैध केल्याचा गंभीर प्रकार माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सन २०२३ मध्ये एकूण १३ हजार ८५६ विद्यार्थ्यांनी आयटीआयमध्ये प्रवेश अर्ज केला असून त्यातील २५७ विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जामध्ये हिंदू धर्माव्यतिरिक्त अन्य धर्माचा उल्लेख केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त २५७ पैकी ४ बौध्द, ३७ मुस्लिम, ३ ख्रिश्चन, १ शीख, १९० इतर आणि २२ विद्यार्थ्यांनी धर्मांचा उल्लेख न केल्याने तसेच शेकडो आदिवासी विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जामध्ये धर्मांच्या कॉलममध्ये हिंदू असता उल्लेख न केलेल्या शेकडो आदिवासी विद्यार्थ्यांना देखील अवैध करण्यात आल्याने त्यांचे शैक्षणिक वर्ष वाया गेल्याचा गंभीर प्रकार निदर्शनास आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील गंभीर प्रकरणी दखल घेवून धर्मांतरीत आदिवासी व इतर विद्यार्थ्यांना हक्क व न्याय मिळवून देण्याकरीता भिवंडीच्या स्थानिक आमदारांनी शासनाकडे व राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाकडे तक्रार केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाकडून धर्मांतर केलेले आदिवासी अनुसचित जमातीच्या आरक्षणाचा लाभ घेण्यास पात्र आहेत की नाहीत याची सखोल चौकशी करण्यात येईल आणि इतर व्यावसायिक शैक्षणिक संस्थांमध्येही यासंदर्भात पडताळणी केली जाईल, तसेच आयोगाने मुख्य सचिवांना दिलेल्या नोटीस मध्ये चौकशी करण्यात यावी असे नमूद केले, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन अवैध प्रवेश ठरविण्यात आलेल्या सर्व विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासह भविष्यात अशी चूक न होण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (२०-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) होय, भिवंडी शहराचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे व राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

(५) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रवेश घेतलेल्या आदिवासी प्रशिक्षणार्थी यांनी घेतलेल्या सवलतीच्या लाभातील अनियमिततेबाबतच्या प्रकरणांचा अभ्यास करण्यासाठी माजी कुलगुरु श्री. मुरलीधर चांदेकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. व सदर समितीच्या कार्यकक्षा ठरविण्यात आली होती. त्यानुसार समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे. सदर अहवाल शासनाने स्विकारला असून आदिवासी जमातीतील लोकांनी धर्मांतर न करण्याकरीता आदिवासी संस्कृती, रुढी, परंपरा, चालीरीती, आदिवासी पोशाख यांचा प्रसार करण्याकरीता व आदिवासी संस्कृतीचे रक्षण व संवर्धन करण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत आदिवासी विकास विभागास दिनांक ५.११.२०२४ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच राष्ट्रीय अनुसूचित जनजाति आयोग, नवी दिल्ली यांना शासनाने आपला अहवाल सादर केला आहे. सदर अहवालानुसार शासनाने शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अनुसूचित जमातीच्या अन्य धर्मात धर्मांतर केलेल्या कोणत्याही प्रशिक्षणार्थीचा प्रवेश रद्द केलेला नाही.

**मौजे घेरा पुरंदर (ता.पुरंदर,जि. पुणे) येथे लॉर्ड बुद्धा इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी स्थापन करण्याबाबत**

**(८) २१४४ (०५-०५-२०२५). श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे घेरा (ता.पुरंदर, जि.पुणे) येथील गट क्र. ५०१५१ वन विभागाच्या अखत्यारीतील ७३६.६३ हेक्टर जमिनीवर लॉर्ड बुद्धा इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी स्थापन करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यापीठ स्थापन करण्यासाठी अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्त अधिकारी यांनी दिनांक १९ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास प्रधान सचिव, वने, महसूल व वन विभाग यांना अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विद्यापीठ स्थापन करण्यासाठी मौजे घेरा पुरंदर (ता.पुरंदर,जि. पुणे) येथे शासकीय वनविभागाची पडीक नापीक जमीन उपलब्ध असून सदर जागेवर विद्यापीठाची स्थापना करण्यासाठी विविध लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, पुणे व इतरांनी सन २०२३-२०२४ मध्ये पत्रव्यवहार केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२३-०६-२०२५) :** (१) खरे नाही.

(२) मौजे घेरा पुरंदर, ता. पुरंदर, जि. पुणे येथील वन विभागाच्या अखत्यारितील सदरचे क्षेत्र राखीव वन घोषित झालेले असून, त्यास वन (संरक्षण व संवर्धन) अधिनियम, १९८० च्या तरतुदी लागू होतात. वनजमिनीवर कोणतीही वनेत्तर कामे करावयाची झाल्यास वन (संरक्षण व संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालय यांच्याकडे सविस्तर प्रस्ताव सादर करुन केंद्र शासनाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे, असे संस्थापक व अध्यक्ष, घेरा पानवडी फाऊंडेशन, पुणे यांना अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांनी दिनांक १९.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) प्रस्तावित विद्यापीठासाठी मागणी करण्यात आलेल्या जमिनी संदर्भातील वस्तुस्थिती अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांनी संस्थापक व अध्यक्ष, घेरा पानवडी फाऊंडेशन, पुणे यांना दिनांक १९.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये अवगत केली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वैतरणा (जि. नाशिक ) जलविद्युत प्रकल्पातील अतिरिक्त जमिनी शेतक-यांना परत मिळण्याबाबत**

**(९) २३८० (२८-०४-२०२५). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैतरणा (जि. नाशिक) जलविद्युत प्रकल्पातील अतिरिक्त जमिनी शेतक-यांना परत मिळण्याकरिता शेतक-यांच्या मागणीसंदर्भात उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास पासून आजतागायत वारंवार लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोकण प्रदेश, मुंबई यांनी शासनाकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठीचा प्रस्ताव दिनांक ३ जून, २०२१ रोजी शासनास सादर केलेले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत?

**श्री. गिरीश महाजन (२७-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिलेल्या निर्देशानुसार उप अधीक्षक, भूमी अभिलेख, इगतपुरी यांनी आवळी दुमाला या गावातील जमिनीची मोजणी व सिमा चिन्हांकन करण्याचे काम पूर्ण केले आहे. तद्नंतर आवळी दुमाला गावातील अतिरिक्त संपादित जमिनीचा विल्हेवाट लावण्याबाबतची पुढील कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

इगतपुरी तालुक्यातील वांजोळे, सातुर्ली, आहुली, कन्होळे या गावांतील अतिरिक्त जमिनीची मोजणी, सीमा चिन्हांकन व नकाशे पूर्ण झालेले असून पुढील कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे. तसेच, मौजे नागोसली, धारगाव, नांदडगाव या गावांचे नकाशे तयार करण्याचे काम उप अधीक्षक, भूमी अभिलेख, इगतपुरी यांच्यामार्फत व त्र्यंबकेश्वर तालुक्यातील देवगाव, आळवंड, मेट्टुंबाची, झारवड, वावीहर्ष, टाकेहर्ष, आव्हाटे गावांचे नकाशे तयार करण्याचे काम उप अधीक्षक, भूमी अभिलेख, त्र्यंबकेश्वर यांच्यामार्फत प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धाराशिव येथे केंद्रीय विद्यापीठ स्थापन करण्याबाबत

**(१०) २४८४ (०५-०५-२०२५). श्री.राणाजगजितसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाराशिव येथे केंद्रीय विद्यापीठ स्थापन करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास च्या लेखी पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धाराशिव जिल्हा हा देशातील आकांक्षित जिल्ह्यांपैकी एक जिल्हा आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धाराशिव जिल्ह्याच्या विकासासाठी शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्व लक्षात घेता, तेथे केंद्रीय विद्यापीठ स्थापन करण्यासाठी लागणाऱ्या जागेचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, धाराशिव यांनी शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, धाराशिव येथे केंद्रीय विद्यापीठ स्थापन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२३-०६-२०२५) :** (१) होय.

(२) होय.

(३) अशंत: खरे आहे. विद्यापीठ उपकेंद्रामध्ये केंद्रीय विद्यापीठासाठी जागा उपलब्ध करुन देण्याची विनंती जिल्हाधिकारी, धाराशिव यांच्या दिनांक २६ जून, २०२३ रोजीच्या पत्राद्वारे करण्यात आली आहे.

(४) केंद्रीय विद्यापीठ स्थापन करणे हा विषय केंद्र शासनाच्या अखत्यायातील असल्याने केंद्र शासनाकडे यासंदर्भात विचारणा केली असता राज्यात किमान एक केंद्रीय विद्यापीठ कार्यरत असल्यास नवीन केंद्रीय विद्यापीठ स्थापन करण्याऐवजी सध्या कार्यरत उच्च शिक्षण प्रणालीचे एकत्रीकरण करुन अस्तित्वात असलेल्या संस्थांची क्षमता वाढवून विस्तार करण्याचे धोरण असल्याबाबत केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने दिनांक २१ एप्रिल, २०२५ अन्वये कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वैनगंगा -नळगंगा- पैनगंगा नदीजोड प्रकल्पास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(११) २७८० (२४-०४-२०२५). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैनगंगा-नळगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्पाला राज्यपालांची, मंत्रिमंडळाची तसेच एम डब्ल्यू आर आर ए ची मान्यता व प्रशासकीय मान्यतेनंतर सर्वेक्षणाची निविदा प्रकाशित झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त नदीजोड प्रकल्पाची दैनिक देशोन्नती या वर्तमानपत्रामध्ये दिनांक १२ सप्टेंबर, २०२४ रोजी ३९५ कोटी रुपये सर्वेक्षणाची निविदा प्रकाशित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू नदीजोड प्रकल्प हा "विदर्भाचे वाटर ग्रिट" ठरणार असून विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि दीर्घ काळापासून विदर्भातील सिंचनाचा असलेला अनुशेष, आणि या प्रकल्प पूर्णत्वाचा, दहा वर्षाचा कालावधी विचारात घेता, या प्रकल्पावर लवकरात लवकर काम करण्याची नितांत आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकल्पाच्या सर्वेक्षणासाठी पुरेसा निधी उपलब्ध झालेला नसल्याने प्रकल्प प्रलंबित असल्याने यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा मुख्यमंत्री यांचेकडे माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी स्वरूपात केली आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वेनगंगा-नळगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्पास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२०-०६-२०२५) :** (१) होय,
(२) होय,

वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाची सर्वेक्षणाची रू.३८५.४६ कोटी व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) रू.९.७९ कोटीची निविदा एकूण १८ वर्तमानपत्रात प्रकाशित करण्यात आली असून, दैनिक देशोन्नती त्यापैकी एक आहे.
(३) होय,

वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाच्या भाग-१ अंतर्गत सर्वेक्षणाच्या कामाकरिता दिनांक १३/०१/२०२५ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे.

सर्वेक्षणाची निविदा व सर्वेक्षणाचे काम कालबध्द नियोजनानुसार होणेकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नेमणुक दिनांक २०/०१/२०२५ अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत.

सदर प्रकल्पामुळे नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलडाणा या ६ जिल्ह्यांकरीता एकूण ३७१२७७ हे. क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.
(४) हे खरे नाही.

वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाच्या भाग-१ अंतर्गत सर्वेक्षण कामाकरीताचा खर्च विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर करीता मंजुर ठोक तरतुदीतुन भागविण्यासाठी शासनाने मान्यता प्रदान केली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लातूर व धाराशिव जिल्ह्यातील विनाअनुदानित महाविद्यालयांना अनुदान मंजूर करणेबाबत

**(१२) २८४८ (२८-०४-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यातील औसा तालुका तसेच धाराशिव जिल्ह्यातील उमरगा व लोहारा तालुक्यातील विनाअनुदानित महाविद्यालयांना विशेष बाब म्हणून अनुदान मंजूर करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (औसा) यांनी तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री यांना दिनांक ६ ऑक्टोबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीनुसार अनुदान मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१९-०६-२०२५) :** (१) खरे आहे.

(i) लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील आझाद महाविद्यालय, औसा येथील वाणिज्य विद्याशाखेस अनुदान मिळणेबाबतचे तत्कालीन मा. उपमुख्यमंत्री यांना उद्देशित दिनांक ११.०९.२०२४ रोजीचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.

(ii) धाराशिव जिल्ह्यातील उमरगा व लोहारा तालुक्यातील महाविद्यालयांना विशेष बाब म्हणून अनुदान मंजूर करणे बाबतचे कोणतेही स्वतंत्र निवेदन या कार्यासनास/विभागास प्राप्त झालेले नाही. परंतु भूकंपग्रस्त भागातील विनाअनुदानित महाविद्यालयांना विशेष बाब म्हणून अनुदान मंजूर करणेबाबतची निवेदने जून ते जुलै, २०२४ दरम्यान विभागास प्राप्त झाली आहेत.

(२) दिनांक १७.०५.२००१ रोजी तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली उपसमितीच्या बैठकीमध्ये, यापुढे कायम विना अनुदान तत्वावर नवीन महाविद्यालय सुरू करण्यास परवानगी देणेबाबतचा निर्णय घेण्यात आला.

त्याचप्रमाणे, मंत्रिमंडळानेही दिनांक २४.११.२००१ रोजीच्या बैठकीमध्ये शालेय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकिय शिक्षण इ. क्षेत्रात नवीन शासकीय संस्था उघडण्यात येऊ नयेत. मात्र अलिकडे अवलंबलेल्या धोरणानुसार कायम स्वरुपी विना अनुदानित तत्वावर खाजगी क्षेत्रात अशा संस्था उघडण्यास परवानगी देण्यास हरकत नसावी, असा निर्णय घेतला.

उपरोक्त मंत्रिमंडळ उप समिती व मंत्रिमंडळाचा निर्णय विचारात घेऊन शैक्षणिक वर्ष २००१ नंतर नवीन महाविद्यालये / विषय / अभ्यासक्रम / विद्याशाखा / अतिरिक्त तुकड्या यांना कायम स्वरुपी विना अनुदानित तत्वावर मंजूरी देण्याचे धोरण अवलंबविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय विद्यापीठात "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्र" स्थापन करण्याबाबत**

**(१३) २८९६ (०५-०५-२०२५). श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात न्याय, समानता आणि सर्वसमावेशक विकासाला चालना देत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन महिलांच्या सक्षमीकरणासाठी उपक्रम राबविण्यात यावेत, शासन व्यवस्थेत पारदर्शकता आणि नैतिकता यांचे पालन व्हावे तसेच अहिल्यादेवी होळकर यांच्या अद्वितीय नेतृत्वाचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी व त्यांचे विचार समाजात दृढ करण्यासाठी राज्यातील शासकीय विद्यापीठात "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्र" स्थापन करण्याची मागणी जत मतदार संघातील लोकप्रतिनिधींनी मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांचेकडे दिनांक २८ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली हे खरे आहे काय,

(२) तसेच, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त राज्यातील सर्व शासकीय विद्यापीठांमध्ये अहिल्यादेवींच्या कार्यावर आधारित "राष्ट्रीय परिषद / चर्चासत्रांचे आयोजन करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१६-०६-२०२५) :** (१) खरे आहे.

(२) खरे आहे.

(३) महाराष्ट्रातील विविध अकृषि विद्यापीठांमध्ये थोर व्यक्तींच्या नावे अध्यासन केंद्र निर्माण करण्यासंदर्भात तयार

करण्यात आलेल्या धोरणास मा.मंत्रीमंडळाने मान्यता दिली असून, नवीन अध्यासन केंद्र सुरु करावयाची असल्यास विद्यापीठ निधीतून सुरु करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.त्यानुसार सर्व विद्यापीठांना दिनांक १८.०९.२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सदर वस्तुस्थिती मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या स्वाक्षरीने दिनांक ०६.०३.२०२५ रोजी मा.लोकप्रतिनिधी यांना कळविण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गडचिरोली येथे सहसंचालक (उच्च शिक्षण) कार्यालयाची निर्मिती करण्याबाबत**

**(१४) ३१३४ (०५-०५-२०२५). श्री.करण देवतळे (वरोरा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली येथील आदिवासी मुला - मुलींना शेकडो किलोमीटर दूर नागपूर येथील सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयात वारंवार कामानिमित्त यावे लागते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गडचिरोली येथे सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाची निर्मिती करण्याबाबत तत्कालीन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी आश्वासन देऊनही कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार गडचिरोली येथे सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाची निर्मिती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२०-०६-२०२५) :** (१) नाही,
विद्यार्थ्यांची बहुतांश कामे ही महाविद्यालय स्तरावरील असल्याने विद्यार्थ्यांना विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) या कार्यालयात वारंवार जाण्याची आवश्यकता भासत नाही.
(२) व (३) गडचिरोली येथे विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाची निर्मिती करणेबाबत संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्याकडून प्राप्त प्रस्तावावर नियमानुसार कार्यवाही करणेबाबत प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मान्यताप्राप्त वरिष्ठ महाविद्यालयांच्या अनुदानाच्या प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत**

**(१५) ३१९९ (०५-०५-२०२५). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने कायम विनाअनुदानित धोरण लागू करण्यापूर्वी म्हणजेच २४ नोव्हेंबर २००१ पूर्वी ७८ वरिष्ठ महाविद्यालयांना मान्यता देऊन २४ वर्षांचा कालावधी होऊनही अद्यापही प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही वरिष्ठ महाविद्यालये प्रामुख्याने ग्रामीण भागात कार्यरत असून तेथे शिक्षण घेणारे विद्यार्थी हे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याने सदर अनुदानाचा निर्णय झाला तर आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात येतील, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाविद्यालयांना अनुदान मिळण्याबाबतचा सर्व प्रशासकीय पूर्तता करुन प्रस्ताव उच्च व तंत्र शिक्षण विभामार्फत वित्त विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ रोजी पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१९-०६-२०२५) :** (१) सन २००१ पूर्वी कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आलेल्या नवीन महाविद्यालय व विद्याशाखा यांना अनुदान मंजुर होणेबाबतचा प्रस्ताव संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी त्यांच्या दिनांक १५.०१.२०२४ च्या पत्रान्वये शासन मान्यतेस्तव सादर केला होता. त्यामध्ये एकूण ८६ महाविद्यालये व २६ विद्याशाखा यांचा समावेश होता.

(२) सदर महाविद्यालयांना अनुदान देण्यात येत नसले तरी या विभागामार्फत कार्यन्वित राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना व अन्य शिष्यवृत्ती योजनांच्या माध्यमातून सदर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताची काळजी घेतली जाते.
त्याचप्रमाणे उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दिनांक ०८.०७.२०२४ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्ग (SEBC) तसेच इतर मागास वर्ग (OBC) मुलींना उच्च शिक्षणामध्ये शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्काच्या १०० टक्के लाभ देण्यात येत आहे.
(३) व (४) होय, हे खरे आहे.
सदरहू प्रस्ताव उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत वित्त विभागास दिनांक १ मार्च, २०२४ व दिनांक १५ ऑगस्ट, २०२४ रोजी सादर करण्यात आला होता.
उपरोक्त प्रस्तावास वित्त विभागाकडून सहमती दिलेली नाही.
(५) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## माहूर किनवट (जि.नांदेड) तालुक्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बेकायदेशीर प्रतिनियुक्त्यांबाबत

**(१६) ३२५० (१८-०४-२०२५). श्री.भीमराव केराम (किनवट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील माहूर-किनवट तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी नियुक्तीच्या ठिकाणावरून इतरत्र तात्पुरत्या व्यवस्थेच्या नावावर नियमबाह्यरित्या प्रतिनियुक्तीवर आहेत काय,
(२) तसेच, अशा सर्व विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या प्रतिनियुक्त्या रद्द होणार काय,
(३) असल्यास, आदिवासी क्षेत्रातील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या नियमबाह्य प्रतिनियुक्त्यांबाबत शासनाकडून नव्याने आदेश होणार काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (२५-०६-२०२५) :** (१) नांदेड जिल्हा परिषद अंतर्गत विविध कार्यालयात शासनाच्या महत्वकांक्षी योजना व आस्थापना विषयक बाबी विहित मुदतीत पार पाडण्यासाठी प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार गट क संवर्गातील १७ आणि गट ड संवर्गातील ४ कर्मचाऱ्यांच्या सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.
(२) नांदेड जिल्हा परिषदेने दिनांक ०२.०५.२०२५ रोजीच्या आदेशान्वये प्रशासकीय कामाकाजाच्या दृष्टीने गट क व गट ड मधील कर्मचाऱ्यांच्या सेवा वर्ग/ सेवा उपलब्ध/ अतिरिक्त कार्यभार याबाबतचे निर्गमित केलेले आदेश रद्द केले आहेत आणि संबंधित कर्मचारी मूळ पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू झालेले आहेत.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुक्त विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू करण्याबाबत

**(१७) ३२९९ (०५-०५-२०२५). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्त विद्यापीठाची शिक्षण पध्दती दूरस्थपध्दतीने शिक्षण देणारी असल्याने त्यांना वर्गखोल्या किंवा उपकेंद्रांची आवश्यकता नसणे, विद्यार्थ्यांना पुस्तके किंवा ई-साहित्य उपलब्ध करुन देण्यात येणे, विद्यापीठ कायद्यानुसार प्रशासकीय व विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी केंद्र उभारता येणे, अशी केंद्रे राज्याच्या अनेक भागात उपलब्ध असून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अधिनियम, १९८९ मध्ये मुक्त विद्यापीठांनी राज्यात अन्यत्र कोठेही उपकेंद्र सुरु करण्याची तरतूद नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाने राज्यात उपकेंद्र उघडण्याचा नियमबाह्य प्रकार केला आहे, या प्रकारामुळे विद्यार्थ्यांच्या पैशांचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाकडूनच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अधिनियम, १९८९ मधील कलम ५ (११) चे उल्लघंन झाले आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१६-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, कायदा, १९८९ मधील कलम ५ (१) (x) मध्ये "to establish, maintain or recognize such regional centers as may be determined by the University from time to time" अशी तरतूद आहे.

(२) हे खरे नाही.

विभागीय केंद्रे/उपकेंद्रे स्थापन केल्यामुळे विद्यार्थी, अभ्यास केंद्रे, विद्यापीठांशी निगडीत विविध घटकांना विद्यापीठाच्या सोईसुविधा नजिकच्या अंतरावर उपलब्ध होऊन विद्यापीठासह या सर्वांचा प्रवास खर्च, वेळ, इ.अमूल्य बचत होऊन, या सर्वांना फायदाच होत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) लागू होत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आवारामध्ये कार्यक्रम आयोजित करण्याबाबत

**(१८) ३६१२ (०५-०५-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा परिसर तसेच नाशिक आणि अहिल्याबाई येथील उपकेंद्राच्या आवारामध्ये कोणतेही कार्यक्रम, उपक्रम, आंदोलन, पथनाट्य किंवा कोणतेही कार्यक्रम करण्यासाठी आठ दिवस पूर्व परवानगी घेणे बंधनकारक करण्याबाबत परिपत्रक काढण्यात आले आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिपत्रकाच्या विरोधात विद्यार्थी संघटनेने आंदोलन करून संबंधित नियम रद्द करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यापीठाच्या आवारामध्ये कार्यक्रमात पथनाट्य व आंदोलने करण्याबाबत आठ दिवस पूर्व परवानगी घेण्याचा जाचक नियम रद्द करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली का वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ६ (13)

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१९-०६-२०२५) :** (१) होय.
(२) होय.
(३) सदर विषय विद्यापीठस्तरावरील असून पुढील कार्यवाहीसाठी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूरमधील बनावट विद्यापीठांकडून विद्यार्थ्यांना होणाऱ्या फसवणुकीला आळा घालण्याबाबत

**(१९) ३७९२ (२८-०४-२०२५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशात २१ बनावट विद्यापीठे कार्यरत असून त्यापैकी एक विद्यापीठ राज्यातील नागपूर येथे कार्यरत असणे तसेच नागपूरमधील राजा अरेबिक युनिव्हर्सिटीचे नावही बनावट विद्यापीठांच्या यादीत येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा विद्यापीठांकडून विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या फसवणुकीला आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२३-०६-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे. शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांनी दिनांक १२ एप्रिल, २०२३ रोजीच्या पत्रान्वये विद्यापीठ अनुदान आयोगाने संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या २० बोगस विद्यापीठांबाबत माहिती दिली आहे. त्यामध्ये राज्यातील राजा अरेबिक विद्यापीठ, नागपूर या विद्यापीठाच्या नावाचा समावेश आहे.
(२) सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांनी सदर विद्यापीठाबाबत माहिती घेतली असता, विद्यापीठाचा पत्ता व विद्यापीठाबाबतची अधिकची माहिती उपलब्ध होत नाही. सदर विद्यापीठात कोणत्याही विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्यात येऊ नये, अशा प्रकारची अधिसूचना वृतपत्रात प्रसिद्ध करण्याबाबत संचालक, माहिती व जनसंपर्क कार्यालय, नागपूर विभाग यांना दिनांक २० फेब्रुवारी, २०२४ तसेच ४ मार्च, २०२५ रोजी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## Bsc इंन पॅरामेडिकल टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमाचे पदवीधरांना शस्त्रक्रिया तंत्रज्ञ हे पद शैक्षणिक पात्रतेनुसार शासनाच्या सेवेत निर्माण करणे बाबत

**(२०) ४२११ (२८-०४-२०२५). श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १७ शासकीय महाविद्यालयामध्ये सन २०१० पासून Bsc इंन पॅरामेडिकल टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमाचे पदवीधरांना महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ, नाशिक यांच्याद्वारे शस्त्रक्रिया तंत्रज्ञ हे पद शैक्षणिक पात्रतेनुसार शासनाच्या सेवेत भरती प्रक्रियेत निवड करणेबाबत पॅरामेडिकल संघटनेकडून व लोक प्रतिनिधिकडून दिनांक १० जानेवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांना निवेदन देण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर त्या विद्यार्थ्यांना शस्त्रक्रियागार तंत्रज्ञ म्हणून स्वतंत्ररित्या पद निर्माण करून नेमणूक करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०४-०७-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकानुसार संचालनालयाच्या अधिनस्त रुग्णालयांमध्ये पद निर्मिती करण्यात आलेली आहे. मात्र शस्त्रक्रियागार तंत्रज्ञ हे पद राष्ट्रीय आयुर्विज्ञान मानकामध्ये विहीत करण्यात आलेले नसल्यामुळे सदरचे पद निर्माण करण्यात आलेले नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात शहरी भागात नागरी क्षेत्रात वाढीव अंगणवाड्यांची मागणी होत असल्याबाबत**

**(२१) ४६८९ (२४-०४-२०२५). श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये शहरी भागात नागरी क्षेत्रात वाढ होत असल्याने वाढीव अंगणवाड्यांची मागणी होत आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाढत्या लोकसंख्ये प्रमाणात वाढीव अंगणवाड्यांची मागणी होत असताना सदर अंगणवाड्यांना मंजुरी मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाढीव अंगणवाड्यांची मंजुरी केंद्र शासनामार्फत होत असल्याने मंजुरीसाठी विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वाढीव अंगणवाडी मंजुरीचे अधिकार राज्य शासनाकडे येण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (१३-०५-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) एकात्मिक बाल विकास सेवा योजना या केंद्र पुरस्कृत योजनेतंर्गत नवीन अंगणवाडी केंद्र सुरु करण्याकरिता केंद्र शासनाची मान्यता आवश्यक आहे. त्यानुसार राज्यात नवीन अंगणवाडी सुरू करण्यासंदर्भात केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन सुधारित प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे.

---

**हेटवणे (ता. पेण जि. रायगड) येथील धरण मध्यम या प्रकल्पाचे कार्यारंभ आदेश न झाल्याबाबत**

**(२२) ४६९१ (२९-०४-२०२५). श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हेटवणे (ता.पेण, जि.रायगड) येथील धरण मध्यम प्रकल्पाच्या कामाची सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळावी याकरीता स्थानिक शेतकऱ्यांनी पेण खारेपाट विकास संकल्प संघटनेच्या माध्यमातून केलेल्या आंदोलनाची दखल घेत शासनाने अग्रक्रम समितीमध्ये सदर प्रस्ताव मंजूर देऊन सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामाची निविदा प्रक्रिया सुरु करुन दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निविदा उघडण्यात येऊनही अद्यापर्यंत कामाचे कार्यारंभ आदेश न झाल्याने काम सुरु करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सदर कामाचे कार्यारंभ आदेश देऊन काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. गिरीश महाजन (२०-०६-२०२५) :** (१) होय हे खरे आहे.
हेटवणे मध्यम प्रकल्पाच्या रू. ७६६.७२ कोटी किंमतीस दिनांक १५/०३/२०२४ च्या शासन निर्णयान्वये चतुर्थ

सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.
(२) होय हे खरे आहे.

हेटवणे प्रकल्पाच्या बंदिस्त नलिका वितरण प्रणाली टप्पा १ या कामाची निविदा सूचना दिनांक १५/१०/२०२४ रोजी उघडण्यात आली. कंत्राटदाराने सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करून सदर कामाच्या निविदेच्या तांत्रिक व आर्थिक मुल्यांकनास सक्षम स्तरावर मान्यता झालेली असून प्रचलित शासन कार्यपद्धतीनुसार निविदा मंजूरी प्रस्ताव शासन स्तरावर प्रगतीत आहे.
(३) शासन स्तरावरून निविदेस मान्यता झालेनंतर कार्यारंभ आदेश निर्गमित करून काम सुरू करण्याची पुढील कार्यवाही करणे नियोजित आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**कॅन्सर होऊ नये याकरीता करावयाच्या उपाययोजना**

**(२३) ४७०० (३०-०४-२०२५). श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत एक लाख नागरिकांमध्ये १०८ पुरुषांना तर ११६ महिलांना कॅन्सरचे निदान होत असल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात कॅन्सरचे रुग्ण मोठ्या प्रमाणावर आढळून येत असल्याने या गंभीर आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (३०-०६-२०२५) :** (१) होय,

NCDIR विभागाच्या सर्वेक्षणानुसार सदर बाब निदर्शनास आली आहे.
(२) राज्यातील कर्करोगाचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत प्रतिबंधात्मक, निदान, उपचार आणि संदर्भ आरोग्य सेवा उपचार देण्यात येतात.

प्रतिबंधात्मक - आरोग्य सेवा उपकेंद्र स्तरावर ३० वर्षापेक्षा अधिक वय असलेल्या महिलांची स्तन कर्करोग आणि गर्भाशयमुख कर्करोग तपासणी केली जाते. तसेच ३० वर्षापेक्षा अधिक वयोगटातील महिला आणि पुरुषांची मुख कर्करोग करिता तपासणी केली जाते.

कर्करोग निदान आरोग्य सेवा- जिल्हानिहाय काही ठराविक रुग्णालय स्तरावर कर्करोग निदानाकरिता (बायोप्सी, सी.टी.स्कॅन,ई.) आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

कर्करोग उपचार आरोग्य सेवा- टाटा मेमोरियल रुग्णालयाच्या तांत्रिक सहकार्याने राज्यातील ८ जिल्ह्यात डे-केअर किमोथेरपी आरोग्य सेवा देण्यात येत असून राज्यातील ११ जिल्ह्यात महाराष्ट्र कॅन्सर वॉरियर उपक्रमांतर्गत मुख कर्करोग उपचाराबाबत प्राथमिक उपचार दिले जात आहेत.

कर्करोग सदर्भ आरोग्य सेवा- कर्करोग बाधित रुग्णांना उपचार देण्याकरिता संदर्भ आरोग्य सेवेमार्फत शासकीय आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत संलग्न रुग्णालयामार्फत उपचार दिले जात आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात "स्मार्ट अंगणवाडी " हा उपक्रम राबविणेबाबत**

**(२४) ४७६१ (२४-०४-२०२५). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.राजेश**

**क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामीण भागातील बालकांना दर्जेदार शिक्षण मिळावे, अंगणवाडीत येण्यासाठी आवड निर्माण व्हावी तसेच अंगणवाड्यात अद्यावत उपकरणे आणि सुविधांनी सुसज्ज याकरिता "स्मार्ट अंगणवाडी" हा उपक्रम राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्मार्ट अंगणवाडीच्या नावांचे प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आले असून निधी अभावी ही योजना राबविण्यात शासन अपयशी ठरत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सांगली जिल्हयात १८० अंगणवाडया स्मार्ट झाल्या असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार स्मार्ट अंगणवाडी योजना राबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (१३-०५-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही,

सन २०१९-२० या आर्थिक वर्षापासून अंगणवाडी केंद्रांचे रुपांतर आदर्श अंगणवाडी करणेसाठी महिला व बाल विकास विभागामार्फत "स्मार्ट अंगणवाडी" योजना राबविण्यात येते. सन २०१९-२० ते २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये एकूण १६८८५ अंगणवाडी केंद्रांचे स्मार्ट अंगणवाडीत रुपांतर करण्यात आले असून त्याकरिता रुपये २३७.८१ कोटी एवढा खर्च झाला आहे. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात राज्यातील २४३० अंगणवाडी केंद्राना स्मार्ट अंगणवाडी किट पुरवठा करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(३) सांगली जिल्ह्यातील सन २०२१-२२ ते २०२३-२४ या आर्थिक वर्षात ३८० अंगणवाडी केंद्रांना स्मार्ट अंगणवाडीत रुपांतर करण्यात आलेले आहे. तर सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात १०० अंगणवाडी केंद्रांचे स्मार्ट अंगणवाडीत रुपांतर करण्यात येत आहे.
(४) राज्यात आदर्श अंगणवाडी ही नियमित योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेमध्ये अंगणवाडयांचा दर्जा सुधारुन व त्यांच्या पायाभूत सोयी-सुविधांमध्ये वाढ करुन त्यांना आदर्श अंगणवाडीमध्ये रुपांतरीत करण्यात येत आहे. स्मार्ट अंगणवाडी केंद्रात रुपांतर करण्यासाठी शिल्लक अंगणवाडी केंद्रांसाठी दरवर्षी वार्षिक रु ९० कोटी निधी अर्थसंकल्पित करण्यात येत आहे. निधी उपलब्धतेनुसार स्मार्ट अंगणवाडया तयार करण्याचे काम सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंजनगांव सुर्जी, (जि.अमरावती) येथील चंद्रभागा नदीवर मौजे साखरी येथे बेरेज खारोळी प्रकल्पाच्या बांधकामास मंजूरी देण्याबाबत

**(२५) ५०७५ (२९-०४-२०२५). श्री.गजानन लवटे (दर्यापूर) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंजनगांव सुर्जी, (जि.अमरावती) येथील चंद्रभागा नदीवर मौजे –साखरी येथे बेरेज (खारोळी प्रकल्प) बांधकाम मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक १७ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्या सुमारास कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकल्पाबाबत आवश्यक असलेले सर्वेक्षण पूर्ण झाले असून विभागीय स्तरावर कार्यवाही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकल्पाकरिता पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र देखील प्राप्त झाले असूनही अदयाप मंजूरीस विलंब होत असल्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (१९-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
सदर प्रकल्प प्राथमिक अवस्थेमध्ये असून प्रकल्पाबाबत आवश्यक मानचित्र अभ्यास व प्राथमिक सर्वेक्षण पुर्ण करण्यात आले आहे.
(३) प्रकल्पास मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान, नाशिक यांचेकडून ४.८५ द.ल.घ.मी. पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त आहे. तथापि, मा. राज्यपाल महोदय, यांच्या सन २०१२-१३ मधील निदेशांनुसार नविन पाटबंधारे प्रकल्प हाती न घेण्याचे निर्देश असल्यामुळे सदर प्रकल्पाची पुढील कार्यवाही स्थगित ठेवण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दौंड (जि. पुणे) तालुक्यातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजनेअंतर्गत अनेक कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(२६) ५१०३ (२४-०४-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड (जि. पुणे) तालुक्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत सुमारे २३ योजना मंजूर करण्यात आलेल्या असून त्यापैकी फक्त २ योजनांची कामे पूर्ण झालेली आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनांमधील ११ योजना अपूर्ण असून १० योजनांची कामे अडचणीमुळे बंद आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पाणी पुरवठा योजनांची कामे तातडीने पूर्ण करून शुद्ध पाणी पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१६-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
उक्त योजनांपैकी १९ योजनांची कामे प्रगती पथावर आहेत. यापैकी ८ योजनांची कामे करताना प्रामुख्याने खालील प्रमाण अडचणी आल्या-
अ) सार्वजनिक बांधकाम विभागाची परवानगी मिळण्यास विलंब.
आ) उंच टाकी बांधण्याची जागा उपलब्ध न होणे,
इ) साठवण तलावाच्या जागेसंदर्भात जलसंपादा विभागासोबत करारनामा करणे.
ई) जलशुध्दीकरण केंद्रासाठी गायरान जागा अप्राप्त.
वर नमूद अडचणी असल्यातरी या योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच उर्वरीत २ योजनांची कामे विविध कारणांमुळे बंद झाली होती, तथापि सद्यस्थितीत ती चालू करण्यात येत आहेत.
(३) सर्व योजनांची कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने सुक्ष्म नियोजन करुन त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यात येत आहे.
(४) लागू नाही.

---

## सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना चालना देण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात "एमएसएमई पार्क" उभारणेबाबत

**(२७) ५१८१ (२४-०४-२०२५). श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना चालना देण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात तब्बल १०० एकर जागेवर "सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग पार्क" (Micro Small and medium enterprises) (एमएसएमई पार्क)) उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने केलेल्या अंमलबजावणीची सद्यस्थिती काय आहे,

(३) असल्यास, नांदेड जिल्ह्यात सदर "एमएसएमई पार्क" उभारण्यासाठी जागा निश्चित करण्यात आली आहे काय ?

**श्री. उदय सामंत (१२-०६-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) नांदेड जिल्हयात एमएसएमई पार्क उभारण्यासाठी सुयोग्य जागा पाहणी करण्याची कार्यवाही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या स्तरावर सुरु आहे.

(३) नाही.

तथापि म.औ.वि. महामंडळाचे मारतळा औद्योगिक क्षेत्र स्थापन करणेसाठी मौजे मारतळा, कुंभारगाव व कापसी (बु.) ता.लोहा जि. नांदेड येथील ४६८.६९ हे. आर खाजगी व ११४.२० हे. आर सरकारी असे एकूण ५८२.८९ हे. आर निश्चित करण्यात आलेले आहे. सदर प्रस्तावित क्षेत्रापैकी प्रथम टप्यात ११४.२० हे.आर सरकारी क्षेत्रास मऔवि अधिनियम १९६१ चे कलम २ खंड (ग) च्या तरतुदी लागू करणेबाबत मा. उच्चाधिकार समितीने मंजूरी प्रदान केलेली आहे.

प्रस्तावित मारतळा औद्योगिक क्षेत्राच्या भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झाल्यावर एमएसएमई पार्क उभारणी संदर्भात सुसाध्यता तपासून सदर जागा योग्य असल्यास, प्रस्तुत औद्योगिक क्षेत्रात एमएसएमई पार्क उभारण्याची तजवीज म.औ.वि. महामंडळाकडून ठेवण्यात आली आहे.

---

## मौजे आहेर वडगाव (ता.जि.बीड) येथील जलजीवन मिशन अंतर्गत कामातील दिरंगाईबाबत

**(२८) ५४४५ (२४-०४-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आहेर वडगाव (ता.जि.बीड) येथील नळ पाणी पुरवठा विभागाच्या वतीने कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक ०२/०२/२०२३ रोजी वा त्यासुमारास श्री.उदय कन्स्ट्रक्शन, लातूर यांच्या नावे पारित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम होणेबाबत ग्रामस्थ व ग्रामपंचायतीच्या वतीने वारंवार कार्यालयाशी पाठपुरावा करण्यात आला असून तसेच ग्रामस्थांनी याविषयी धरणे आंदोलन ही केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कामातील कंत्राटदाराने शासनाच्या सर्व नियमावलीचे उल्लंघन केले आहे तसेच सदर काम लवकर पूर्ण झाल्यास भविष्यातील ग्रामस्थांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त कंत्राटदारामुळे झालेल्या अनेक अनियमिततेमुळे सदर काम जिल्हा परिषद अधिनियम तथा शासनाच्या नियमानुसार रद्दबातल करून सदर जलजीवनचे काम दुबार निविदा काढून मुदतीत होणेबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्र व्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले त्यानुसार संबंधित कंत्राटाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१२-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे. ग्रामस्थांनी दिनांक ०९.०१.२०२५ व दिनांक २०.०१.२०२५ नुसार ठेकेदार काम करीत नसल्याने काम सुरु करणेबाबत धरणे आंदोलनाबाबत निवेदन दिले होते.
(३) अंशत: खरे आहे.
(४) याप्रकरणी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्र व्यवहार केला आहे हे खरे आहे.
(५) मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, बीड मार्फत संबंधित ठेकेदारास काम बंद असल्याच्या कारणास्तव व कामे सुरु न केल्यास निविदेच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून काम रद्द करुन Clause (३)(४) नुसार नाव काळया यादीत टाकण्यात येईल असे कळविण्यात आले आहे.
त्याअनुषंगाने संबंधित ठेकेदाराने केलेला खुलासा मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांना जिल्हा परिषद, बीडमार्फत कळविण्यात आला आहे.
सदर प्रकरणी योजनेचे काम ठेकेदाराकडून माहे फेब्रुवारी २०२५ पासून सुरु असून योजनेचे वितरण व्यवस्थेचे काम ९० टक्के व शुध्द जल उध्दरण वाहिणीचे काम ७० टक्के प्रगतीत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड जिल्ह्यात गटविकास अधिकाऱ्यांच्या अनागोंदी कारभाराबाबत

**(२९) ५५५५ (२४-०४-२०२५). श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामपंचायतींच्या इमारती सुसज्ज, सुशोभित असाव्यात यासाठी शासनाने सुरू केलेल्या "बाळासाहेब ठाकरे मातोश्री स्मृती ग्रामपंचायत योजनेचा" नांदेड जिल्ह्यात गटविकास अधिकाऱ्यांच्या अनागोंदी कारभारामुळे बोजवारा उडाला असून सदर योजना कागदावरच असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेसाठी कोट्यवधी रुपये मंजूर असतानाही अद्यापी जिल्ह्यात योजनेअंतर्गत एकही काम पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने संबंधीत दोषींवर कारवाई करणेबाबत व उक्त योजना जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (०५-०६-२०२५) :** (१) व (२) नाही, हे खरे नाही.
मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजने अंतर्गत आजमितीपर्यंत नांदेड जिल्ह्यातील २३७ ग्रामपंचायतींच्या इमारत बांधकामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यापैकी ३० ग्रामपंचायती या इतर योजनेतून मंजुर झाल्या असल्याने रद्द करण्यात येऊन ७ ग्रामपंचायतींचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. यास्तव उर्वरीत इमारतींची बांधकामे प्रगतीपथावर आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शेल्टे (ता.वाडा, जि.पालघर) येथील पाझर तलावाच्या बंधाऱ्याची दुरुस्ती करणेबाबत

**(३०) ५७६१ (२४-०४-२०२५). श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेल्टे (ता.वाडा, जि.पालघर) येथील पाझर तलाव बंधारा दिनांक २१ जुलै, २०२१ रोजी फुटल्याने संपूर्ण गावात

व शेतात पाझर तलावाचे पाणी शिरल्याने ग्रामस्थांचे व शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तलावाच्या पाण्यावर शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह अवलंबून असल्याने पाझर तलाव बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी वारंवार ग्रुप ग्रामपंचायत शेल्टे-वाघोटे यांचेकडून स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्यानुषंगाने सदर बंधाऱ्याची तात्काळ दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०२-०६-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सदर कामाच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक शासनास प्राप्त झालेले असून निधी उपलब्धतेनुसार दुरुस्ती कामाची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रांजणगाव शेणपुंजी (ता.गंगापूर,जि.संभाजीनगर) या वाळूंज महानगरात रोज चार टन कचरा जाळण्यात येत असल्याबाबत**

**(३१) ५८६० (२४-०४-२०२५). श्री.प्रदिप जैस्वाल (छत्रपती संभाजीनगर मध्य) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील वाळुंज येथील रांजणगाव शेणपुंजी येथील ग्रामपंचातीमध्ये रोज चार टन कचरा जाळला जात असल्यामुळे १० हजार नागरिकांना त्रास होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील महिन्यात डंपिंग ग्राउंडला लागून असलेल्या एका कंपनीला ऑर्डर देण्यासाठी खास जपानचे पथक आले असतांना कचरा पाहूनच ते गाडीतून उतरले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर ग्रामपंचायतीच्या परिसरातील कचऱ्याची गंभीर समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२७-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही.
ग्रामपंचायत रांजणगाव शेणपुंजी येथील विविध वसाहतीमध्ये तयार होणारा कचरा ग्रामपंचायतीच्या घंटागाड्यांमार्फत गोळा करुन त्यांचे विलगीकरण करुन व्यवस्थापित करण्यात येतो.
सदरहू ठिकाणी मागील सहा महीन्यांपासून कचरा विलगीकरणाचे (सेग्रीगेशन) मशीन बसवून त्याव्दारे दररोज १.५ ते २ टन कचऱ्याचे विलगीकरण करुन त्याचे खत केले जाते. त्यामुळे तेथे कुठल्याही प्रकारचा कचरा जाळला जात नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आरापूर ( जि. छत्रपती संभाजीनगर ) येथे नविन एम.आय.डी.सी. प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत**

**(३२) ५८६५ (२४-०४-२०२५). श्री.प्रदिप जैस्वाल (छत्रपती संभाजीनगर मध्य) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरापूर (जि. छत्रपती संभाजीनगर ) येथे नविन एमआयडीसीचा प्रस्ताव पाच वर्षापूर्वी सादर करण्यात आला असून या एमआयडीस च्या उच्चाधिकार समितीने तीन वर्षापूर्वी त्यांस मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरापूर येथे नविन एम.आय.डी.सी.च्या प्रस्तावास केव्हापर्यंत मान्यता मिळणे अपेक्षित आहे,
(३) तसेच, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. उदय सामंत (१२-०६-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३)
सद्यस्थितीत प्रस्तावित क्षेत्राची म.औ.वि.महामंडळाच्या भूनिवड समिती सदस्यांमार्फत दिनांक २०.०२.२०२५ रोजी स्थळपाहणी करण्यात आली असून, मौजे आरापूर,गवळी,शिवरा व मौजे सुलतानाबाद येथील ७५२.४३ हे.आर खाजगी व ९.६० हे.आर सरकारी क्षेत्र असे एकूण ७६२.०३ हे.आर क्षेत्रास महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ अन्वये प्रकरण ६ व कलम २ खंड (ग) च्या तरतुदी लागू करुन प्रस्तावित क्षेत्राची अधिसूचना निर्गमित करण्यासाठी प्रस्ताव शासनास सादर करण्याची कार्यवाही म.औ.वि. महामंडळामार्फत सुरु आहे.

---

**वरठाण तालुक्यातील (जि.छत्रपती संभाजीनगर) बनाटी हिवरा नदीवर जलसंरक्षण विभागाच्या पाचही कोल्हापूरी बंधाऱ्यांना दरवाजे नसल्याबाबत**

**(३३) ५८६९ (२४-०४-२०२५). श्री.प्रदिप जैस्वाल (छत्रपती संभाजीनगर मध्य) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरठाण तालुक्यातील (जि.छत्रपती संभाजीनगर) बनाटी हिवरा नदीवर जलसंरक्षण विभागाच्या पाचही कोल्हापूरी बंधाऱ्यांना दरवाजे नसल्याने पावसाचे साचलेले लाखो लिटर पाणी वाहून गेल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे शेतकऱ्यांना रब्बी पिकांना पाणी देण्यास अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने उक्त बंधाऱ्यांना त्वरीत दरवाजे बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०१-०७-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
(३) चौकशी करण्यात आलेली नाही. तथापि, जिल्हा परिषदेच्या सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात तरतूद करुन सदर बंधा-यांना गेट बसविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) निधीच्या तरतुदी अभावी विलंब झालेला आहे.

---

**चंद्रपूर जिल्ह्यातील ताडाळी औद्योगिक वसाहतीतील धारिवाल इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीत काम करणाऱ्या फील्ड ऑपरेटरचा मृत्यू झाल्याबाबत**

**(३४) ५९३९ (२४-०४-२०२५). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील ताडाळी औद्योगिक वसाहतीतील धारिवाल इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीत कण्व्हेअर बेल्टमध्ये अडकल्याने कंपनीत काम करणाऱ्या फील्ड ऑपरेटरचा मृत्यू झाल्याचे दिनांक १२ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दुर्घटनेमुळे कंपनीतील कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने सदर कामगारांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष करणाऱ्या कंपनी व्यवस्थापनाविरुद्ध कारवाई करण्यात आली व मृत कामगारांच्या कुंटुंबास तातडीने आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (२०-०५-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर अपघाताची चौकशी करण्यात आली असून अपघाताच्या दिवशी कारखान्यातील कोल हँडलिंग प्लांटमधील कव्हेअर बेल्ट व फिरत्या पुलीला योग्य ते सुरक्षा गार्ड न लावल्यामुळे सदरचा अपघात झालेला आहे.
(३) सदर अपघाताची चौकशी करण्यात आली असून सदर अपघाताप्रकरणी कव्हेअर बेल्ट व फिरत्या पुलीला योग्य ते सुरक्षा गार्ड न लावल्यामुळे कारखान्याचे भोगवटादाराविरुध्द कारखाने अधिनियम, १९४८ चे अंतर्गत कलम २१ (१)(iv)(c) अन्वये खटला दाखल करण्यात आला आहे.

कारखाना व्यवस्थापनाने मृत कामगाराच्या वारसास सानुग्रह अनुदानाची रक्कम रु. ७० लाख दिलेली आहे. तसेच सदर मृत कामगाराच्या वारसास रु. १३,८१,२७५/- इतकी नुकसान भरपाई रक्कम कामगार न्यायालय, चंद्रपूर जमा करण्यात आली आहे. तसेच मृत कामगाराच्या पत्नीला नोकरी देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शेत/पाणंद रस्ते ग्रामीण मार्ग म्हणून दर्जोन्नती करणेबाबत.**

**(३५) ५९४४ (२५-०४-२०२५). श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शेत-पाणंद रस्ते ग्रामीण मार्ग म्हणून दर्जोन्नती करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.ग्राम विकास मंत्री महोदयांना नुकतेच दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर निवेदनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (२५-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
स्थानिक लोकप्रतिनिधींनी त्यांचे दिनांक १३.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये ४८ शेत/पाणंद रस्ते ग्रामीण मार्ग म्हणून दर्जोन्नत करण्याची मागणी केली आहे.
(२) उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने रस्ते दर्जोन्नतीबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत ग्रामविकास विभागाच्या दिनांक २२.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये क्षेत्रीय कार्यालयास कळविण्यात आले आहे. त्यानुसार रस्ते दर्जोन्नतीचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचे स्तरावर सुरु आहे. याबाबत दिनांक २४.०६.२०२५ रोजी स्मरणपत्र पाठवून पाठपूरावा करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प अंतर्गत अंगणवाडी कर्मचारी भरती प्रक्रियेत झालेली अनियमितता**

**(३६) ६०२० (२५-०४-२०२५). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प अंतर्गत अंगणवाडी सेविका, मदतनीस व मीनी अंगणवाडी सेविका पदभरती प्रक्रिया सन २०२५ मध्ये अनियमितता झाल्याचे माहे जानेवारी मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील भरती प्रक्रियेतील अनियमितता संदर्भात सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी लोकप्रतिनिधीकडून केल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, नांदेड यांनी याबाबतची उच्चस्तरीय चौकशी करण्यासाठी उप मुख्यकार्यकारी अधिकारी (बा.वि.) जि.प.नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या पत्रान्वये चौकशी समिती गठित केली असून सदर समितीने अंतरिम चौकशी अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भरती प्रक्रियेत बालविकास प्रकल्प अधिकारी एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प, मुखेड यांनी अनियमितता व भरती प्रक्रिया सदोष केल्याचे चौकशी समितीच्या अंतरिम अहवालानुसार दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भरती प्रक्रियेत दोषी बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, पुणे यांच्याकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार भरती प्रक्रियेत झालेल्या अनियमतेतेबाबत दोषी असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (१३-०५-२०२५) :**(१), (२), (३) हे खरे आहे.

(४), (५) व (६) हे खरे आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने संबंधितांविरुध्द कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**जलजीवन मिशन कार्यक्रमाच्या सुधारित अंदाजपत्रकाबाबत**

**(३७) ६०२८ (२४-०४-२०२५). श्री.अतुलबाबा भोसले (कराड दक्षिण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिण्याचा पाणी पुरवठा संबंधीच्या जलजीवन मिशन या कार्यक्रमाला केंद्र शासनाने नुकतीच मुदतवाढ दिली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मुदतवाढीमुळे आता या कार्यक्रमामधील प्राप्त सुधारित अंदाजपत्रकांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणे सुलभ होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कराड (जि.सातारा) तालुक्यामधील बहुतांश नळ पाणी पुरवठा योजनांमध्ये काही उपांगे, उदा. सौर ऊर्जा संयंत्र, नवीन पाणी उद्भव, वाढीव पाईपलाईन इ. नव्याने समाविष्ट करण्याची आवश्यकता असल्याने ती समाविष्ट करुन, सुधारित अंदाजपत्रके सादर करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०७-०७-२०२५) :** (१) होय, हे अशंत: खरे आहे.

या कार्यक्रमाला माहे डिसेंबर, २०२८ पर्यंत मुदतवाढ देण्याची प्रक्रिया पेयजल व स्वच्छता विभाग, जल शक्ती मंत्रालय, भारत सरकार यांचेमार्फत सुरु आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) जल जीवन मिशन योजनेंतर्गत मंजूर असलेल्या योजनांपैकी काही योजनांच्या उपांगांची वाढीव कामे त्यांची आवश्यकता व तांत्रिक व्यवहार्यता तपासून सुधारित अंदाजपत्रके तपासून सुधारित मान्यतेसंबंधीत कार्यवाही करण्याबाबत अधिनस्त यंत्रणांना सूचित केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यांतर्गत विमानसेवा सक्षमीकरणासाठी रिलायन्स एअरपोर्ट डेव्हलपमेंट लि. या कंपनीस दिलेल्या कंत्राटाबाबत

**(३८) ६०५२ (२४-०४-२०२५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अंतर्गत विमानसेवा सक्षम व्हावी यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने बारामती,लातूर, नांदेड, यवतमाळ आणि धाराशीव या पाच विमानतळाची कामे करण्यासाठी सन २००९ मध्ये ९५ वर्ष भाडेपट्टा कराराद्वारे रिलायन्स एअरपोर्ट डेव्हलपमेंट लि. या कंपनीला दिलेले कंत्राट रद्द करुन पाचही विमानतळ ताब्यात घेण्याचा निर्णय घेतल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कंपनीने गेली १५ वर्षात कंत्राट दिलेल्या ५ विमानतळांपैकी किती विमानतळांचे काम पूर्ण केले व किती विमानतळाचे बांधकाम अपूर्ण आहेत,
(३) असल्यास, सदरहू कंपनीचे कंत्राट रद्द केल्यानंतर कंपनी व्यवस्थापनावर १५ वर्षे विलंबाबत व विकासकामाकडे दुर्लक्ष केल्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१६-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मे. रिलायन्स एअरपोर्ट डेव्हलपमेंट लि. यांना बारामती, लातूर, नांदेड, यवतमाळ आणि धाराशिव या पाचही विमानतळांचे सक्षमीकरण करणे आणि हवाई सेवा सुरु करण्यासाठी /राहण्यासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता सदर विमानतळे भाडेपट्टा करारनामा अटी व शर्तीसह ऑक्टोबर व नोव्हेंबर,२००९ मध्ये ९५ वर्षाच्या भाडेपट्टा करारनाम्यानुसार हस्तांतरीत करण्यात आली होती. तथापि, मे. रिलायन्स एअरपोर्ट डेव्हलपमेंट लि. या कंपनीने करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार विमानतळांचे अद्यावतीकरण, देखभाल, दुरुस्ती व परिचालन केले नाही.
(३) मे. रिलायन्स एअरपोर्ट डेव्हलपर्स लि. यांच्याकडून करारनाम्यातील अटी व शर्तींचे झालेले उल्लंघन पाहता; मे. रिलायन्स एअरपोर्ट डेव्हलपर्स लि. यांना दिलेले बारामती, लातूर, नांदेड, यवतमाळ आणि धाराशिव ही पाचही विमानतळे दिनांक ०८/०४/२०२५ रोजी योग्य प्रक्रियेचा अवलंब करून ताब्यात घेतली आहेत. नांदेडसह सदर पाचही विमानतळ पुढील परिचालन तसेच देखभाल दुरुस्तीकरीता महाराष्ट्र विमानतळ विकास कपंनी ( MADC) यांना हस्तांतरीत करण्याची प्रक्रिया मऔवि महामंडळाकडून सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कर्जत व जामखेड ( जि.अहमदनगर) तालुक्यातील जल जीवन मिशन योजनेच्या समस्यांबाबत

**(३९) ६१६६ (२४-०४-२०२५). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत व जामखेड या दोन तालुक्यांतील सुमारे १९१ गावांच्या मिळून एकूण १७० पाणीपुरवठा योजनेच्या कामांची अंदाजपत्रके तयार करताना अनेक ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातील वाड्या व वस्त्यांचा समावेश नसल्याचे निदर्शनास आले असून सदर नळपाणी पुरवठा योजनांच्या कामांबाबत स्थानिक ग्रामस्थांच्या व सरपंच, उपसरपंच इत्यादींच्या अनेक तक्रारी शासनाला प्राप्त झालेल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही ठिकाणी नळ पाणीपुरवठा योजनेच्या पाईपलाईनची खोली अतिशय कमी आढळून येणे, पाईपलाईन बुजवताना दगडांच्या थराचा वापर होणे, पिण्याच्या पाण्याची टाकी व विहिरीच्या कामांमध्ये तांत्रिक चुका आढळून येणे याबाबत संबंधित शाखा अभियंता, उपभियंता, कार्यकारी अभियंता यांनी स्थळ पाहणी करून संबंधित ठेकेदारास सूचना दिल्या असणे परंतू अद्यापी आढळलेल्या त्रुटी तांत्रिक अडचणी यावर शासन स्तरावर आदेश होऊनही कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने शासनाने संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२४-०६-२०२५) :** (१) अंशतः खरे आहे.

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत अहिल्यानगर जिल्हा परिषदेमार्फत कर्जत व जामखेड तालुक्यांत एकूण १६६ योजना मंजूर असून कर्जत तालुक्यातील ९८ योजनांमध्ये १०० गावे व जामखेड तालुक्यातील ६८ योजनांमध्ये ७५ गावांचा समावेश आहे. कर्जत तालुक्यातील ५८ योजना व जामखेड तालुक्यातील ५० योजना अशा एकूण १०८ योजनांसाठी ग्रामपंचायतींचे मागणीनुसार व स्थानिक उद्भवात बदल इत्यादी कारणास्तव सुधारीत अंदाजपत्रके करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

तसेच जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत एकूण ५ योजना प्रगतीत असून या ५ योजनांपैकी कोंभळी व इतर ११ गावे या योजनेत काही वाड्या वस्त्यांचा समावेश करण्यात आला नव्हता. सदर वाड्या वस्त्यांचा समावेश सुधारीत अंदाजपत्रकात करण्यात आला असून सुधारीत अंदाजपत्रके व आराखडे तयार करणे प्रगतीत आहे.

(२) हे खरे नाही.
पाणी पुरवठा योजनांचे त्रयस्थ तपासणी यंत्रणा मार्फत पाहणी करण्यात येते. त्यात काही त्रुटी आढळल्यास त्या दुरुस्त करण्यात येतात. आवश्यकता असल्यास संबंधितांवर उचित कार्यवाही करण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात विविध प्रकारच्या रुग्णालयांमधील निम्नवैद्यकीय (पॅरामेडिकल) मनुष्यबळाच्या भरती प्रक्रियेबाबत**

**(४०) ६३३६ (०५-०५-२०२५). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण, शहरी, निमशहरी, महानगरांमधील विविध प्रकारच्या रुग्णालयांमध्ये निम्नवैद्यकीय (पॅरामेडिकल) मनुष्यबळाचा तुटवडा १६ ते ६४ टक्के असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मनुष्यबळाशी संबंधित आकडेवारी थेट विद्यार्थ्यांशी निगडित असून 'रिक्रुटमेंट रुल'मध्ये समावेश नसल्याने पात्रता आणि पदवी असूनही या विद्यार्थ्यांना भरतीप्रक्रियेत समाविष्ट करून घेतले जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भरती प्रक्रिया न झाल्यामुळे रिक्त राहणाऱ्या जागांमुळे आरोग्य यंत्रणेवर ताण येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार राज्यातील विविध प्रकारच्या रुग्णालयांमधील निम्नवैद्यकीय (पॅरामेडिकल) मनुष्यबळाच्या भरती प्रक्रियेबाबत कोणती उपायोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०१-०७-२०२५) :** (१) वैद्यकीय शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असणाऱ्या संस्थामध्ये गट-क तांत्रिक संवर्गातील एकूण मंजूर पदांपैकी ५४ टक्के पदे भरण्यात आलेली आहे. तसेच सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे स्पर्धा परीक्षा-२०२५ मार्फत भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(२) संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयांमध्ये आरोग्य विज्ञानपीठामार्फत परावैद्यक बाबतचे एकूण १३ अभ्यासक्रम सुरू आहेत.त्यापैकी गट-क तांत्रिक संवर्गातील परावैद्यकीय अभ्यासक्रमांचा समावेश असलेली ०६ सवंर्गातील एकूण ३५३ पदे स्पर्धा परीक्षा-२०२३ मार्फत भरण्यात आलेली आहेत.

(३) व (४)

गट-क- तांत्रिक संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता स्पर्धा परीक्षा-२०२३ चे आयोजन करून या स्पर्धा परीक्षेमार्फत तांत्रिक संवर्गातील एकूण ८६१ पदे भरण्यात आलेली आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चांदवड तालुक्यातील (जि.नाशिक) गावांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नियोजन शून्य कारभारामुळे एक महिना उलटूनही पाणी मिळत नसल्याबाबत

**(४१) ६३७४ (०५-०५-२०२५). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदवड तालुक्यातील (जि.नाशिक) गावांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ४४ गाव पाणीपुरवठा योजनेच्या नियोजन शून्य कारभारामुळे एक महिना उलटूनही पाणी मिळत नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावातील नागरिकांना नियमित पाणी मिळत नसल्याने संतप्त नागरिकांनी उपोषणाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्याअनुषंगाने सदर उक्त ४४ गाव पाणीपुरवठा योजना प्रभावीपणे राबवून गावांना तात्काळ पाणी मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२४-०६-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

सद्यस्थितीत चांदवड ४४ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतून एकूण ६० गावांना पाणी पुरवठा होतो त्यापैकी तळेगांव व निंबाळे या दोन गावांना जवळच्या मार्गस्थ गावांच्या गुरुत्ववाहिनीवरील व्हॉल्वचे अज्ञातांकडून परिचालनामुळे तसेच पीएससी पाईप लाईनची गळती उद्भवल्यानंतर दुरुस्ती कामांमुळे व वीज पुरवठा खंडीत होण्यामुळे फेब्रुवारी महिन्यात १५ ते २० दिवसांचा विलंब कालावधी झाला. मात्र त्यानंतर योजनेतील समाविष्ट गावांना माहे मार्च-२०२५ मध्ये सुरळीत पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) तातडीची उपाय योजना म्हणून मार्गस्थ व दुरस्थ गावांच्या गुरुत्ववाहिनीवर उद्भवलेल्या दुरुस्त्या करुन पाणी पुरवठा सुरळीत सुरु करण्यात आला. तसेच मार्गस्थ जवळच्या पाईप लाईनच्या ठिकाणी परस्पर पाणी घेण्याच्या अवैध घटना घडल्या त्या अनधिकृत जोडण्या बंद करण्यात आल्या. याबाबत पोलिस प्रशासनाकडे तक्रारी अर्जाद्वारे तक्रार नोंदविण्यात आली.

योजनेची पाईप लाईन २५ वर्षे जुनी असल्याने गळती होण्याचे प्रमाण वाढले असल्याने व योजनेची पाणी तुट कमी करण्याच्या दृष्टीने, पंपीग मशिनरी जुनी झालेली असल्यामुळे, कायमची उपाय योजना म्हणून जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत रेट्रो फिटींग चांदवड ४४ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना प्रस्तावित करण्यात आलेली आहे. सदर योजनेची मुळ मंजूर किंमत रु.१३.४३ कोटी एवढी आहे. योजनेतंर्गत उर्ध्ववाहिनी व गुरुत्ववाहिनीमध्ये २७ कि.मी.

लांबीची डी.आय. प्रकारची पाईप लाईन प्रस्तावित असून त्यापैकी २३.५० कि.मी. पाईप लाईन टाकण्यात आलेली आहे. तसेच ३०० अश्वशक्तीचे व्ही.टी. पंप बदलण्याचे काम प्रगतीत आहे. गळती प्रतिबंधाच्या दृष्टीने अतिरिक्त आवश्यक डी. आय. पाईप लाईन व अनुषंगिक स्पेशल्स इत्यादी समावेशासह रु.१९.३४ कोटीची सुधारीत योजना तांत्रिक मान्यतेच्या कार्यवाहीसाठी प्रगतीत आहे. सदर नुतन पंपींग मशिनरीमुळे पाणी उपसामध्ये वाढ होवून वाढीव पाणी उपलब्ध होईल. रेट्रो फिटींग योजनेमुळे गळतीचे प्रमाण कमी होणार असून पाणी पुरवठा निश्चित सुरळीत होणार आहे. योजनेच्या कामांची भौतिक प्रगती ८८ % असून योजनेची कामे जुलै २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे वडगाव (ता.लोहारा, जि.धाराशिव) येथील मंजूर साठवण तलावाच्या कामांना २४ वर्षानंतर कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्याबाबत**

**(४२) ६६९५ (०५-०५-२०२५). डॉ.तानाजी सावंत (परांडा) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे वडगाव (ता.लोहारा, जि.धाराशिव) येथील गावांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून सन १९९९ मध्ये साठवण तलावाला मंजूरी देण्यात आलेली होती परंतू तब्बल २४ वर्षांनी सदर तलावाच्या कामास कार्यारंभ आदेश दिल्याचे दिनांक २८ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तालुक्यातील वाडीवडगांव येथील नागरिकांनी व शेतकऱ्यांनी सन १९९९ साली मंजूर असलेल्या साठवण तलावाचे काम सुरु करण्यासाठी आंदोलनाचा इशारा दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तलावास कार्यारंभ आदेश मिळण्यास २४ वर्षांचा प्रदिर्घ कालावधी लागण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०७-०७-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) मौजे वडगाव (ता. लोहारा, जि. धाराशिव) येथील साठवण तलावाचे काम करण्यास शेतक-यांचा विरोध असल्यामुळे दिनांक २८.१०.१९९९ रोजी कार्यारंभ आदेश देवूनसुध्दा प्रकल्प प्रलंबित होता. शेतकऱ्यांच्या विरोधामुळे निविदा रद्द करण्यात आली होती.
(४) सदरील प्रकल्प सन २०२० साली विभागास हस्तांतरीत झालेला असून दिनांक २६.१२.२०२३ रोजी कामास कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच भूसंपादन करतेवेळी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्यामार्फत भुसंपादनाची प्रक्रिया पूर्ण झाली नव्हती. तसेच जे भूसंपादन केले होते त्यामध्ये त्रुटी दिसून आल्या आहेत. सद्या भूसंपादनाची प्रक्रिया प्रगतीपथावर असून शेतकऱ्यांचा विरोध दिसून येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धाराशिव जिल्ह्यातील "मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा" टप्पा-१ अंतर्गत विजेत्या शाळांना बक्षिस वितरणास झालेल्या विलंबाबत**

**(४३) ६७०७ (०५-०५-२०२५). डॉ.तानाजी सावंत (परांडा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धाराशिव जिल्हयातील जिल्हा परिषद व खाजगी शाळा अशा दोन गटातील शाळेंचा शासनाच्या वतीने राबविण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या अभियानामध्ये समावेश करण्यांत आला असून मुख्यमंत्री सुंदर माझी शाळा टप्पा- २ चालू आहे परंतू टप्पा १ मधील विजेत्या शाळांना बक्षिसाची रक्कम अद्यापही प्राप्त झाली नसल्याचे माहे

जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व शाळांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून शासनाने घेतलेल्या निर्णयाचा प्रतिसाद म्हणून बहुतांशी शाळांनी यात सहभाग होऊन शाळा सजावट व भौतिक सुविधा यामध्ये मोठया प्रमाणांत खर्च केला असून त्याअनुषंगाने प्रशानाकडून टप्पा-१ च्या विजेत्यांकरीता बक्षिसांच्या रक्कमा अदा करण्यात आलेल्या असतानाही स्थानिक प्रशासनाकडून त्याचे वितरण करण्यास टाळाटाळ होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन टप्पा १ मधील विजेत्या शाळांच्या बक्षिसाची रक्कम तातडीने वितरीत करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२०-०६-२०२५) :**(१) व (२) हे खरे नाही.
(३) जिल्ह्यातील सर्व विजेत्या शाळांना बक्षिसाची रक्कम वितरीत करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मु.पो.सुरुर (ता.वाई, जि.सातारा) या गावातील जागेत असलेल्या ७० वर्षे जुन्या विहिरीची दुरवस्था झाली असल्याबाबत.

**(४४) ७००५ (०५-०५-२०२५). श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मु.पो.सुरुर (ता.वाई, जि.सातारा) या गावातील बौध्द वस्तीतील सिटी सर्व्हे क्रमांक ८६ या जागेत असलेल्या ७० वर्षे जुन्या विहिरीची दुरवस्था झाली असल्याने नागरिकांची पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उन्हाळयात सदर गावांत दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण होत असून गावांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत असल्याने सदर विहिरीतील गाळ व कचरा काढून विहिरीची दुरुस्ती करण्याची मागणी नागरिक व स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर विहिरीची दुरुस्ती करुन गावकरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२७-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही. मौजे सुरुर (ता. वाई, जि. सातारा) या गावातील बौध्द वस्तीतील सिटी सर्व्हे क्रमांक ८६ या ठिकाणी जुनी विहिर असून तीची दुरावस्था झाली आहे.परंतू सदर विहिरीची दुरवस्था झाली असल्याने नागरिकांची पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आलेले नाही.
(२) हे खरे नाही. सदर गावात सध्या दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली नाही. सन २०२३-२०२४ साली पर्जन्यमान कमी झाल्यामुळे टंचाई सदृष्य परिस्थिती निर्माण झालेली होती. सन २०२३-२०२४ मध्ये दिनांक १७/०४/२०२४ ते २६/०५/२०२४ या कालावधीत श्री. सदाशिव विनायक जाधव यांची खाजगी विहीर अधिग्रहण करून गावास पाणी पुरवठा करण्यात आला होता. सदर विहिरीतील गाळ व कचरा काढून विहिरीची दुरुस्ती करण्याची मागणी नागरिक व स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(३) सदर विहीरीची दुरुस्ती करणेबाबत अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे. सद्यस्थितीत गावाजवळ असलेल्या नळ पाणी पुरवठा योजनेच्या विहिरीतून पाणी पुरवठा सुरळीत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## श्री.भागवत सोनवणे, शाखा अभियंता यांनी लेखाशिर्ष अंतर्गत केलेल्या कामांतील गैरव्यवहार

**(४५) ७०३१ (०५-०५-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.भागवत सोनवणे हे गेल्या अनेक वर्षापासून शाखा अभियंता जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्र.१ अंतर्गत असलेल्या पाटोदा (जि.बीड) येथे कार्यरत आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाखा अभियंता यांनी लेखाशीर्ष अंतर्गत झालेल्या विकास कामामध्ये दिरंगाई करणे, निकृष्ट दर्जाची कामे करणे, कामाच्या गुणवत्ता न तपासणे तसेच कंत्राटदाराच्या सोबत भागीदारी करणे अशा व इतर अनियमितते बाबत स्थानिक ग्रामस्थांकडून तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील शाखा अभियंता यांच्या कालावधीतील कामांचे कार्यारंभ आदेश, मोजमाप पुस्तिका व जी कामे केली आहेत त्या कामांची गुण नियंत्रण विभाग व त्रयस्त समितीच्या वतीने चौकशी होणे बाबतची मागणी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा परिषदेच्या प्रचलित नियमानुसार पुढील कार्यवाही व्हावी व झालेल्या अनियमिततेच्या बाबतीत चौकशीसह अहवाल देणेबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कळविले आहे हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, यापूर्वी देखील शाखा अभियंता यांची रितसर तक्रार करण्यात आली असून अद्यापर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (२४-०६-२०२५) : (**१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) हे खरे आहे.

(६) कार्यकारी अभियंता, नां. क्र.१ जि. बीड यांचेकडील पत्र क्र. बांवि क्र.१/आस्था-१/कावि/१६८०/२०२५, दिनांक १५.०४.२०२५ अन्वये उप अभियंता, जि. प. (बां.) उपविभाग, आष्टी यांना मा. विधानसभा सदस्य यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सखोल चौकशी करुन अहवाल सादर करणेबाबत दिनांक १५.०४.२०२५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुखेड (जि. नांदेड) जिल्हा परिषदेचा सेस फंड अखर्चित राहिल्याबाबत

**(४६) ७०३३ (०५-०५-२०२५). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि. नांदेड) जिल्हा परिषदेच्या सन २०२४-२०२५ या वर्षात सेस फंडासाठी तरतूद केली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सेस फंडाचा निधी पूर्णत: खर्च करण्यात आलेला नाही तसेच सदर निधी शिल्लक राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने संबंधीत दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (३०-०५-२०२५) :** (१) हे खरे नाही.

जिल्हा परिषदेच्या सेस निधीतून जिल्ह्यातील संपूर्ण तालुक्यांकरिता दरवर्षी तालुकानिहाय वेगळी तरतूद करण्यात येत नसल्याने मुखेड या तालुक्यासाठी वेगळी तरतूद करण्यात आलेली नाही. तथापि, दरवर्षी जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांकडून प्राप्त होणाऱ्या निधीच्या मागणीच्या आधारे जिल्हा परिषदेच्या विविध योजनांसाठी लेखाशिर्षनिहाय तरतूद जिल्हा परिषदेकडून करण्यात येते.

सन २०२४-२५ या वित्तीय वर्षामध्ये जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांसाठी लेखाशिर्षनिहाय एकूण तरतूद रु.३१,९६,३०,८४१/- इतकी करण्यात आली होती. त्यांपैकी प्रत्यक्ष खर्च रु.२०,५५,७९,५१९/- इतका झाला असून रु. ११,४०,४८,३२२/-इतका अखर्चित निधी शिल्लक राहिलेला आहे.

(२) नांदेड जिल्हा परिषदेचा सेस निधी जिल्हा परिषदेच्या विविध विभागांकडून पुढील कारणांमुळे खर्च झालेला नाही-

थेट लाभ हस्तांतरण योजनांचा लाभ शेतकरी/महिला बचत गट यांनी विहित मुदतीत घेतलेला नसणे, समाजकल्याण विभागांतर्गत निवड झालेल्या लाभार्थ्यांकडून परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त न होणे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळांची देखभाल दुरुस्तीची कामे व बांधकाम उपविभागाकडील कामे संबंधित कंत्राटदार यांनी मुदतीत केलेली नसणे, बांधकाम दुरुस्तीचा निधी शिल्लक राहिलेला असणे, बांधकाम विभागांतर्गत पुर्ण झालेल्या कामांनुसार देयकाची परिगणना करून उर्वरित राहिलेली रक्कम, बांधकाम उपविभागाकडून जिल्हा परिषदेस प्रस्ताव प्राप्त न होणे व बांधकाम विभागास इतर लेखाशिर्षामधून कार्यालयीन खर्च, विदयुत देयके इत्यादी कामाकरिता तरतूद प्राप्त होणे,सामान्य प्रशासन विभागाअंतर्गत वेतनासाठी प्रत्यक्ष खर्च कमी झालेला असणे व क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम, वकील फी करिता जिल्हा परिषदेस मागणी प्राप्त न होणे, आरोग्य विभागाने सन २०२३-२४ या मागील वर्षात आवश्यक असणारी साधनसामग्री खरेदी केलेली असणे व राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभागामार्फत आरोग्य विभागास प्रसिद्धी साहित्याचा पुरवठा करण्यात आल्याने, शासनाच्या इतर योजनांतर्गत निधीमधून ग्रामीण पाणीपुरवठा विभागाची विविध विकास कामे झालेली असणे, महिला व बालकल्याण विभागाने शासकीय निधीमधून राबवावयाच्या प्रशिक्षण योजनेस तांत्रिक मान्यता उशिराने प्राप्त होणे, तिर्थक्षेत्राच्या यात्रांसाठी काही ग्रामपंचायतींनी ठराव करून निधीची मागणी न करणे व काही ग्रामपंचायतींचा निधी कमी खर्च होणे.

(३) व (४) जिल्हा परिषदेचा सेस फंड व्यपगत होत नसून अखर्चित निधीचे पुढील वर्षात नियोजन करण्यात येऊन निधी खर्च करण्यात येतो.

---

### राज्यातील जिल्हा पुरस्कार मिळालेल्या सर्व शिक्षकांना अतिरिक्त वेतनवाढीचा लाभ देणेबाबत

**(४७) ७०३४ (०५-०५-२०२५). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा पुरस्कार मिळालेल्या सर्व शिक्षकांना दिनांक ४ सप्टेंबर,२०१८ पर्यंतचा अतिरिक्त वेतनवाढीचा लाभ देण्यात आल्याचे आदेश माहे मे, २०१२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी लोकप्रतिनिधी व महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद पुरस्कार प्राप्त शिक्षक समन्वय समिती जिल्हा शाखा, नांदेड यांनी सन २०१८ ते २०२४ पर्यंत ज्या शिक्षकांना जिल्हा स्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेला आहे. त्या सर्व शिक्षकांना एक अतिरिक्त वेतनवाढ देण्याबाबतच्या मागणीचे निवेदन माहे फेब्रुवारी, २०२५ वा त्या दरम्यान सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करून जिल्हा पुरस्कार मिळालेल्या सर्व शिक्षकांना अतिरिक्त वेतनवाढीचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. जयकुमार गोरे (१३-०६-२०२५) :** (१), (२) व (३) जिल्हा परिषद शाळेतील जिल्हा पुरस्कार प्राप्त शिक्षकांना एक आगाऊ वेतनवाढ देण्याची योजना ग्राम विकास विभागाने शासन परिपत्रक दिनांक ०४.०९.२०१८ व शासन शुद्धीपत्रक दिनांक ०४.०२.२०२० नुसार रद्द केली आहे. सद्य:स्थितीत शासन परिपत्रक दिनांक १२.१२.२००० मधील तरतुदीनुसार केवळ सन २००० ते दिनांक ०४.०९.२०१८ पर्यंतच्या जिल्हा पुरस्कार प्राप्त शिक्षकांना मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार एक आगाऊ वेतनवाढीचा लाभ देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षण विभागातील विविध संवर्गाची पदे रिक्त असल्याबाबत**

**(४८) ७०३६ (०५-०५-२०२५). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हा परिषद शिक्षण विभागातील गटशिक्षणाधिकारी कार्यालय अंतर्गत शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख व पदोन्नत मुख्याध्यावक संवर्गातील अनेक पदे रिक्त असल्याने गुणवत्ता वाढ व सनियंत्रण करण्यास मोठ्या प्रमाणात अडचण निर्माण होत असल्याचे माहे जानेवारी,२०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, लोकप्रतिनिधी यांनी पदोन्नती प्रक्रिया राबविण्यात यावी अशी लेखी मागणी वारंवार करुनही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करुन पदोन्नती प्रक्रिया राबविण्यास विलंब करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सध्या जिल्हा परिषद शिक्षकांचे जिल्हा अंतर्गत बदली प्रक्रियेची कार्यवाही सुरु असून त्यापूर्वी पदोन्नती प्रक्रिया राबविण्यात यावी असे ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णयामध्ये स्पष्ट निर्देश असतांना त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने उक्त पदोन्नती प्रक्रिया राबविण्यासाटी विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (२४-०६-२०२५) :** (१), (२), (३), (४)
विस्तार अधिकारी(शिक्षण), केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक या संवर्गामधील रिक्त पदाचा अतिरिक्त पदभार कनिष्ठ कर्मचारी यांच्याकडे सोपविण्यात येऊन गुणवत्तावाढ व सनियंत्रण करण्यात आले.

या संवर्गाच्या पदोन्नती प्रक्रियेकरीता दिनांक ३१.०८.२०२५ पर्यंत रिक्त होणारी पदे विचारात घेऊन पदोन्नती प्रक्रिया पूर्ण करण्याकरिता, शिक्षक संवर्गाच्या दिनांक ०१.०१.२०२५ स्थित जेष्ठता याद्या प्रथमत: अंतिम करण्यात आल्या आहेत. या जिल्हा स्तरावरील अंतिम सेवा जेष्ठता यादीनुसार पदोन्नती समितीची बैठक घेऊन पदोन्नती करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील अंगणवाड्यांना स्वत:च्या इमारती उपलब्ध करुन देणेबाबत.**

**(४९) ७०३९ (०५-०५-२०२५). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील काहीं अंगणवाडी केंद्राचे स्मार्ट अंगणवाडी करण्याचा प्रयत्न सुरु असून सुध्दा जवळपास निम्याहून अधिक अंगणवाडी केंद्रानां स्वत:ची इमारत नसल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा

त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तालुक्यातील अंगणवाडी केंद्रातून गुणवत्ता पुर्णपूर्व प्राथमिक शिक्षण दिले जात नसल्याचे देखिल निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तालुक्यातील अंगणवाडी केंद्र हे समाजमंदीर, खाजगी शाळा, भाड्याच्या इमारत, प्राथमिक शाळा, ग्रामपंचायती या ठिकाणी भरत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार मुखेड तालुक्यातील अंगणवाडी केंद्राना हक्काची इमारत उपलब्ध करुन देणे बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (१६-०६-२०२५) :** (१), (२) व (३) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत मुखेड, जि.नांदेड या प्रकल्पामध्ये ४१७ अंगणवाडी केंद्र मंजूर असून त्यापैकी १७४-अंगणवाडी केंद्र स्वमालकीच्या इमारतीमध्ये, ८९- अंगणवाडी केंद्र भाडयाच्या इमारतीमध्ये, ६३- अंगणवाडी केंद्र शाळा इमारतीमध्ये व उर्वरित ९१ अंगणवाडी केंद्र ग्रामपंचायत/समाज मंदिर/ इतर ठिकाणी कार्यान्वित आहेत. या अंगणवाडी केंद्रामध्ये पुर्व शालेय शिक्षण ही सेवा नियमितपणे देण्यात येत आहे.
(४) व (५) जिल्हा वार्षिक योजनेतर्गत अंगणवाडी बांधकाम करण्याची तरतूद असून त्याअंतर्गत प्राप्त निधीच्या अनुषंगाने मुखेड प्रकल्पामध्ये अंगणवाडी बांधकामाची कार्यवाही टप्या टप्प्याने करण्यात येत आहे.

---

### मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील योजनाबाह्य रस्ते ग्रामीण मार्ग म्हणून दर्जोन्नत करण्याचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(५०) ७०४० (०५-०५-२०२५). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील ४५ अवर्गीकृत/योजनाबाह्य रस्ते, ग्रामीण मार्ग म्हणून रस्ते विकास योजनेत समाविष्ठ करणे बाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर सादर करण्यात आलेला आहे. असे माहे डिसेंबर ,२०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तालुक्यातील २३ योजनाबाह्य/ अवर्गीकृत रस्त्यांना ग्रामीण मार्ग म्हणून रस्ते विकास योजना २००१-२०२१ मध्ये समाविष्ठ करण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तालुक्यातील उर्वरीत प्रस्तावित ग्रामीण रस्त्यांची दर्जोन्नत करण्याचा प्रस्ताव शासनाकडे त्रृटीचे कारणांमुळे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील प्रस्तावातील त्रृटीची पुर्तता करण्यास विलंब होत असल्याने तालुक्यातील वाडी, तांडे पक्या रस्त्यांनी जोडण्याची कार्यवाही करण्यास अडचण निर्माण होत आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने सदर प्रस्तावास विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (११-०६-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३), (४) व (५) नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील ४५ योजनाबाह्य/अवर्गीकृत रस्ते ग्रामीण मार्ग म्हणून दर्जोन्नत करणेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला होता. त्यापैकी २३ रस्त्यांना ग्रामीण मार्ग म्हणून दर्जोन्नत करण्यास दिनांक

२० सप्टेंबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. उर्वरीत २२ रस्त्यांबाबतचा त्रुटी पुर्तता अहवाल जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडून दिनांक १३ मे, २०२५ रोजी प्राप्त झाला आहे. त्यानुषंगाने सदर प्रस्तावावर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री. जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.